-: प्रेसनोट :-　　　　दिनांक :- ०६/१०/२०२६

# वैद्यकिय पदवी व परवाना नसताना अवैध व्यवसाय करणाऱ्या १० बोगस डॉक्टर यांच्यावर मुंबई गुन्हे शाखेची कारवाई.

---

बृहन्मुंबई मधील भांडुप, मानखुर्द, कुर्ला, जोगेश्वरी, बोरीवली व दहिसर परिसरातील बोगस डॉक्टर त्यांच्याकडे वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही शाखेची पदवी संपादीत न करता त्यांच्याकडे आलेल्या रूग्णांवर गुप्तरोगासंदर्भातील विविध आजारांवर ॲलोपॅथी व आर्युवेदीक, युनानी औषधोपचार करून त्यांचे आरोग्य धोक्यात टाकून त्यांच्याकडून भरमसाठ फी घेवून सामान्य नागरीकांची फसवणुक करतात अशी मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष ७ कार्यालयास विश्वसनीय माहिती प्राप्त झाली.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने कक्ष ७ कार्यालयातील पोलीस पथक यांनी वेगवेगळया दिवशी वैद्यकिय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांचेसह मुंबईतील १) 'संतोष हेल्थ क्लिनिक' भांडुप, २) 'विनायक हेल्थ क्लिनीक' भांडुप, ३) 'हमदम दवाखाना' जोगेश्वरी, ४) 'कोहिनुर दवाखाना' जोगेश्वरी, ५) 'अंकुश आयुर्वेदिक दवाखाना' बोरीवली, ६) दिपक हर्बल हेल्थ केअर क्लिनीक, दहिसर ७) 'समर आर्युवेदीक दवाखाना' मानखुर्द (सदरची कारवाई गुन्हे शाखा कक्ष ६ मार्फत) या ७ क्लिनिकमध्ये छापा टाकुन, तेथे प्रॅक्टीस करीत असलेले १० बोगस डॉक्टर त्यांच्याकडे वैधकिय क्षेत्रातील वैध्य पदवी नसताना किंवा महाराष्ट्र मेडीकल मध्ये नोंदणी नसताना डॉक्टर असल्याचे भासवुन बेकायदेशिररित्या गुप्तरोगांसारख्या विविध आजारावरील रूग्णांवर ॲलोपॅथी व आर्युवेदीक, युनानी औषधोपचार करताना मिळुन आले. तसेच काही क्लिनीकमध्ये बोगस डॉक्टर वैधता संपलेले युनानी व आयुर्वेदीक औषधे विक्री करीत असताना मिळुन आल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. सदर कारवाईत त्यांच्या ताब्यातुन साधारण रुपये २,२०,०००/- किमंतीचे वेगवेगळया प्रकारचे औषधी बॉटल्स, सिरींज, ॲन्टीबायोटिक टॅबलेट्स असे वेगवंगळया प्रकारचे औषधे व वैद्यकिय साहित्य जप्त करण्यात आले. उपरोक्त बोगस डॉक्टरां विरूध्द भांडुप पोलीस ठाणे याठिकाणी कलम ३३, ३६ महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट १९६१ अन्वये गुन्हा नोंद करून सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष ७, घाटकोपर मार्फतीने चालु आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/पुर्व) श्री. धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ७ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अनिल ढोले, पोलीस निरीक्षक श्री. प्रदिप सरफरे, सपोनि. सुहास खरमाटे, सपोनि. धनाजी साठे, सपोनि. महेश शेलार, पोउपनि. अजय गोल्हार, पोउपनि. प्रमोद जंगम, पोउपनि. अरूण सावंत, पोउपनि. तानाजी उबाळे , पोउपनि. नार्वेकर तसेच कक्ष ७ कार्यालयाचे पोलीस अंमलदार यांचे पथकाने पार पाडली आहे.

--//--